बाबा बहुधा जें कांहीं करीत असत, त्याचा अर्थ किंवा बोध स्पष्ट असे. याविषयीं एक उदाहरण देतों. कोपरगांवास वालेंबी मास्तर नांवाचा एक स्टेशन मास्तर होता. त्याची बाबांवर श्रद्धा नव्हती. त्यांनीं मला व इतर भक्तांना सांगितलें कीं, बाबा हा वेडापीर आहे, त्याचें तुम्हीं इतकें स्तोम कां माजवितां? तथापि माझ्याबरोबर शिरडीस बाबाचें दर्शनास येण्यास मीं त्यांचें मन वळविलें. आम्हीं जेव्हां बाबांच्या दर्शनास गेलों, तेव्हां ते बासनें—पात्रें धुवून तीं जमिनीवर 'मुख खालीं व तळ वर' अशीं ठेवीत होते. हें असें कां अस वालेंबी मास्तरानें विचारलें. बाबा म्हणाले कीं, प्रत्येक पात्र जें माझेकडे येतें तें 'अधो-मुख' म्हणजे अग्रहण स्थितींत येतें.

## कान्ह्या भिल्ल

इ. स. १८९८–९९ चे सुमारास कान्ह्या भिल्ल नांवाचा एक डाकू (दरवडे-खोर) नगर व बीड जिल्ह्यांत म्हणजे ब्रिटिश मुलुखांत आणि संस्थानांत चोऱ्या, खून करून धुमाकुळ घालीत होता. एक सारखे तीन वष पोलीस त्याच्या पाठीवर (शोध करीत) होते. पण तो कांहीं सांपडेना. त्यावेळीं मी एक साधा हवालदार होतों. त्याची हालचाल पाहून रिपोर्ट करण्यासाठीं माझी व दुसऱ्या तिघां इसमाची स्पेशल गुप्त हेर म्हणून नेमणूक झालेली होती. कान्ह्या भिल्ल फार धूर्त व लबाड होता आणि त्याचे गुप्त हेरखातें इतकें कांहीं हुशार व तरबेज होते कीं, त्यांनीं त्या तिघां इसमांना गांठून एका मागून एक असे ठार केले. माझे हातून फारसें काम झालें नव्हतें म्हणून मी कुचकामाचा व निरुपयोगी आहे आणि मी कसून प्रयत्न केला पाहिजे असा आमच्या इन्सपेक्टरसाहेबानीं रिपोर्ट केला. त्यावेळीं माझा रामदासी बाणा असे आणि लोणीवर्णी येथील राममंदिरांत राहून कीर्तन करीत असें. तेथील गंगाराम पाटील हा त्या भिल्लाचा मित्र असून त्याला भेटावयास पुष्कळदां येत असे; त्या भिल्लांनीं माझ्या विषयीं सर्व माहिती (माझें नांव, बकल नं. ७२७, स्टेशन वगैरे) मिळविली आणि एके दिवशीं तो मला गोळी घालून ठार मारण्यास आला. मी राममंदिरांत गेलों आणि हे प्रभो, मला वांचीव' अशी श्री रामाची प्रार्थना केली. माझ्यावर आपली नजर आहे अशी मला ताकात देऊन तो भिल्ल निघून गेला. त्याच्या साथीदारांनीं माझ्या-वर पाळत ठेविल्यामुळें मला तो गांव सोडतां येईना. त्या खेड्यांतील मुलांकडून त्या भिल्लाचा कार्यक्रम व हालचाल याविषयीं मी माहिती मिळविली व ती पोलिसांना कळविली. तो भिल्ल ज्या टेकडींत छपून बसला होता, त्या भोंवतीं पोलिसांनीं गराडा घातला. पोलीसांची व त्याची गोळीबारांनी लढाई जुंपली, कांहीं पोलीस मारले गेले व तो भिल्ल पसार झाला.

मला हृदयाचा विकार जडला आहे असे सर्टिफिकेट मिळाल्यामुळें गुप्त हेराच्या कामांतून माझी सुटका झाली. त्यानंतर लोणीवर्णीच्या खेडुतांनीं त्या दरवडेखोराला आश्रय दिला म्हणून राळे मामलेदारासमोर खटला सुरू झाला. त्या गांवच्या पाटलानें मला वेळोवेळीं माहिती देऊन मला मदत केली अशी मी पाटला-तर्फे साक्ष दिल्यामुळें तो दोषमुक्त होऊन सुटला.

मी माझी हद्द सोडून रजा न घेतां एका क्षेत्राला गेलों आणि गोदावरी तीराला जाऊन गोदेचें पाणी हातीं घेऊन बाबाची प्रार्थना करून असा नवस (प्रतिज्ञा) केला कीं, जर बाबानें माझा बचाव केला, तर मी नोकरी सोडून देईन. नंतर त्या त्या क्षेत्रीं कांहीं लुटालुटीच्या मालासहित एक टोळी मला आढळली. ती टोळी व माल पकडून गांवच्या अमिनाबरोबर वार्डन साहेबाकडे त्याच्या ठाण्यावर (मुक्कामावर) पाठविण्यांत आला. दैवी-चमत्कारामुळें माझी सुटका झाली आणि साहेबाचें चांगलें सर्टिफिकेटहि मिळालें. फौजदार व्हावें अशी माझी तीव्र महत्वाकांक्षा होतीच. याकरितां मी परीक्षेस बसून तींत पासहि झालों. पण बाबानीं मला सांगितलें कीं, मला फौजदारी मिळणार नाहीं.

माझी एका गांवीं बदली झाली आणि तेथें जातांना शिरडीवरून जावें लागलें. मी नोकरी चालू ठेविल्यामुळें, तें बाबांना आवडणार नाहीं असें वाटून मी त्यांचें दर्शन घेण्याचें टाळून शिरडी गांवाबाहेरच्या मोठ्या रस्त्यानें चाललों. पण योगायोग असा कीं, मी लेंडीपाशीं मोठ्या रस्त्यावर येतांच, बाबा माझे समोर दत्त म्हणून उभे राहिले. तेव्हां मी घोड्यावरून उतरून त्यांचे चरणावर मस्तक ठेविलें. मशिदीकडे येण्यास त्यांनीं मला सांगितलें. तेथें गेल्यावर बाबांनीं मला विचारलें—गणू गोदेचें पाणी हातांत घेऊन कोणी नवस केला? मी उत्तर दिलें, त्यांत काय बिघडलें, मी खरोखरीच नोकरीचा राजीनामा देणार आहें. त्यावर बाबा म्हणाले—जरा थांब, सर्व कांहीं सुरळितपणें चालल्यामुळें तूं कांहीं आमचें ऐकणार नाहींस.

या नंतर माझा कांहीं अपराध नसतां मी दुसऱ्या एका संकटांत सांपडलों. एका शिक्षा झालेल्या आरोपीच्या दंडाची ३२ रु. रक्कम वसूल होऊन सरकारांत जमा करण्यासाठीं माझे गांवीं पाठविण्यांत आली. ती माझ्या पश्चात् माझ्या असिस्टंटनें घेऊन दाबून टाकिली. पुढें त्या आरोपीची सुटका न झाल्यामुळें त्या दंडाच्या रकमेविषयीं तक्रार होऊन चौकशी सुरू झाली आणि मला सस्पेंड करण्यांत आलें. हें प्रकरण माझेवर शेकणार आणि मला शिक्षा होणार असें दिसूं लागलें. यांतून माझी सुटका झाली तर मी नोकरी सोडीन असा मी पुन्हां नवस केला आणि शेवटीं माझी सुटका झाल्यामुळें मी १९०३ सालीं नोकरीचा राजीनामा देऊन मोकळा झालों.

[अपूर्ण]

Estd.: **1934** Phone: **39288**

**CAMERA HOUSE**

**136, Girgaon Road,**
**BOMBAY 4.**

*For*

DEVELOPING, PRINTING, ENLARGING Etc.

# सगुण भक्तींतील मोक्षाची कल्पना

लेखक–ग. ल. रेगे ( बी. ए. ), पनवेल

सगुणोपासकांची मोक्षाची कल्पना आणि निर्गुणोपासकांची मोक्षाची कल्पना यांमध्यें वरवर पाहणारांसही फार मोठें अंतर आहे असें दिसून येतें. ज्ञानमार्गी निर्गुण उपासनेचा स्वीकार करीत असल्यामुळें त्यांचें अंतिम ध्येय ब्रह्मसाक्षात्कार हें आहे व हें ब्रह्म निर्गुण, निराकार निरंजन निष्क्रिय आहे असें त्यांचें मत आहे. अर्थात् ह्या निर्गुण निराकार ब्रह्मामध्यें स्वतःचा म्हणजे स्वतःच्या आत्म्याचा लय होणें ही त्यांची मोक्षाची कल्पना आहे. हा मोक्ष संपादन करण्यास या पृथ्वीलोकावरून स्वर्गासारख्या दुसऱ्या एखाद्या लोकास जाण्याची आवश्यकता नाहीं. अत्युच्च भूमिकेवरील साधकास ह्या लोकीं आणि ह्या जन्मांतच मोक्षप्राप्ति होणें शक्य आहे. ' न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले ! सर्वाशासंक्षये चेतःक्षयो मोक्ष इतीष्यते—' योगवासिष्ठ '

मोक्ष हा आकाशांत नाहीं कीं, पाताळांत नाहीं. तसेंच तो या पृथ्वीवरहि नाहीं. एकूण एक आशांचा क्षय झाला असतां चित्ताचाहि क्षय होतो. मन निवृत्तिक होणें ह्याचेंच नांव मोक्ष. या कारणें गा रघुनाथा। मनोल्लास मात्रेंचि बद्धता। तें मन होतांचि प्रशमता । मोक्ष आईता स्वतः सिद्ध ॥ (यो. वा.) जीवन्मुक्तास स्वस्वरूपाचें म्हणजे ब्रह्माचें अखंड ज्ञान झाल्यावर अज्ञान व तत्कार्य यांचा निरास होऊन अखंड ब्रह्माचा साक्षात्कार होतो व तो कर्मबंधापासून मुक्त होऊन या जन्मांतच मोक्षाचा अधिकारी होतो. त्याचा देहपात झालाच पाहिजे असें नाहीं. दृढ जीवन्मुक्ति झालिया । तेचि विदेहमुक्ति गा रघुराया। देह नाशिल्या त्या अधिक येईल । का देह असलिया ब्रह्मता जाईल ॥ ( यो. वा. ) जीवनन्मुक्ताचा देह असणें व नसणें या दोन अवस्थांमध्यें तत्वतः मुळींच भेद नाहीं. कारण वसिष्ठ मुनि म्हणतात, जैं कां अपरोक्ष साक्षात्कार। जाला तेव्हांचि तो निर्विकार ॥ जीवन्मुक्त अपरोक्ष साक्षात्कार झाल्यावर आयुष्याचा क्षय होई तोपर्यंत निर्विकारपणें देहधारणा करतो व देहपातानंतर आपोआपच विदेहमुक्तीस प्राप्त होतो.

निर्गुणोपासकांचे मतें जगाचें आदिकारण निर्गुण निराकार परमात्मा आहे, सगुणोपासक जगताचें आदिकारण सगुण साकार वस्तु मानतात. शंखचक्र गदापद्मपाणि पीतांबरधारी श्रीविष्णु ही ती सगुण साकार वस्तु होय. हरि नारायण पुरुषोत्तम हे विष्णूचे पर्याय शब्द होत. श्रीविष्णूची भार्या लक्ष्मी, हीच चित्प्रकृति. हिच्यामुळें विष्णूला लक्ष्मीपतित्व प्राप्त झालें. अखिल

विश्व त्यानेंच उत्पन्न केल्यामुळें, जगत्कर्तृत्वहि त्याजकडे सहजच आलें. सर्वज्ञत्व, जगत्कर्तृत्व व लक्ष्मीपतित्व या तीन गुणांशिवाय भक्ताला श्रीविष्णूचें सर्व वैभव प्राप्त होईल. सगुणोपासक अद्वैताचा अंगीकार करीत नसले तरी आकाशादि पंचमहाभूतें, सूर्यचंद्रादि ज्योति, प्राणी, वृक्ष, नद्या, समुद्र, इतकेंच काय हें सर्व विश्व श्रीहरीचें स्वरूप आहे असें मानतात. ते म्हणतात, आपणहि श्रीहरीचेंच रूप आहो, असें मानून श्रीहरीला वंदन करावें. ' आपणची तो हरि ऐसें **अद्वैत** । अनुभवीतच भक्तें वंदावें ' ॥

निर्गुण ब्रह्माची कल्पना व्यक्त करण्याकरितां निर्गुणोपासकांस द्वैताचा आश्रय करावा लागतो. सगुण भक्तांसही निर्गुणास अजिबात टाळतां येणें शक्य नाहीं, हें पुढील उद्गारांवरून दिसून येईल. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही बैसलाति निर्गुणाचे खोळे । आम्हां कां हे डोळे कान दिले ॥ ' १५०६ ' (तु. गा. शंकर पांडुरंगी ) तरी कर्तृत्व पाहें गुणाचें । ज्ञान तेव्हां गुणापरतें निर्गुणाचें । तो मद्भाव पावतो म्हणजे सगुणाचें । साधर्म्य पावतो (यथार्थ दीपिका) १४–९१.

सत्वे प्रलीना स्वर्यांति नरलोकं रजोमयाः तमोलयास्तु निरयं यान्ति मामेव निर्गुणाः ॥ भागवत XI 25–22 या श्लोकावर पुढील टीका एकनाथ महाराजांची आहे. सर्वांभूतीं मी आत्मा पूर्ण । ऐसें ज्याचें अखंड भजन । तो जितांचि तिन्ही गुण । जिणोनी निर्गुण पावती ॥ माझें स्वरूप निज निर्गुण । अथवा वैकुंठीचें सगुण । दोन्ही एकची निश्चयें जाण । सगुण निर्गुण समसाम्य ॥ का रूप स्मरतां पावे रूप । तरी निर्गुण स्मरतां निर्गुण रूप । पावेल कीं ऐसा प्रताप । मरणकाळीं ही ॥

## उत्पत्तीची प्रक्रिया

मुक्तीची कल्पना येण्यास उत्पत्तीची प्रक्रिया स्थूलरूपानें माहित असणें आवश्यक आहे. भागवत सांप्रदायानुसार जीव व शिव यांमध्यें अभेद नसून जीवात्मा व परमात्मा या दोन्ही भिन्न वस्तु आहेत. भूमिरापोऽनलो वायु खं मनो बुद्धिरेवच । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ' भ. गी. vii–४, पृथ्वी, उदक, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार मिळून जड प्रकृति होते. याशिवाय

Gram: ARTLEATHER Phone: **71615**

**THE WESTERN INDIA MFG'S AGENCY Private LTD.**

**Specialists in P. V. C. Art Leather Cloth in Charming Designes for furnitures, Book Binding Cloth & Auto Seat Covers. Motor and Bus Body Fittings Accessories & Chemois Leather etc.**

456, Sandhurst Road, Besides Gold Field Leather Works.
BOMBAY 4.

चेतना–चित्प्रकृति आहे. हीच श्रीहरिप्रिया लक्ष्मी होय. ही लक्ष्मी श्रीविष्णूच्या आज्ञेनें जड प्रकृतीस सृष्टिकार्याविषयीं प्रेरणा देते. म्हणूनच गीतेतील 'मम योनिर्महद्ब्रह्म' या पादांतील ब्रह्म शब्दाचा अर्थ द्वैतसांप्रदायी चित्प्रकृति महालक्ष्मी असा करतात. भगवान् विष्णु सर्व विश्वाचें निमित्तकारण असून प्रकृति ही उपादान कारण आहे. दोन्ही प्रकृति चेतना व अचेतना, परमात्मा जो श्रीहरी त्याच्या स्वाधीन असतात. देवी लक्ष्मी आपल्या तमोगुणाभिमानी अशा दुर्गारूप शक्तीनें मिथ्याज्ञान उत्पन्न करून सर्व जीवांना मोहित करते, पण जे श्रीविष्णूची भक्ति करतात, ते अज्ञानापासून दूर होऊन निरतिशय, आनंदयुक्त, व समानरूप देणाऱ्या अशा मुक्तिप्रत जातात. मुक्त झालेले जीव विष्णुलोकास गेल्यावर मरण व दुःख यांनीं रहित असा चांगला देह पावतात. वैकुंठ लोक अचेतन असला तरी तो नित्य आहे. कारण चित्प्रकृति महालक्ष्मी आपल्या प्रिय परमात्म्याच्या संतोषाकरितां वैकुंठ लोक रूपानें तेथें वास करते. भगवान् श्रीविष्णु हाच सच्चिदानंद परब्रह्म, परमात्मा होय. वैष्णव पंथाला अभेदाभास म्हणजे परमेश्वर व जीव एकच आहेत, ही कल्पना मान्य नाही. त्यांच्या मतें जीव चित्स्वरूपी नित्य आहे. जीव ईश्वराचें प्रतिबिंब आहे. तरीपण तो अल्पशक्ति व परतंत्र आहे. तो अपूर्ण असून किंचित् ज्ञ आहे. जीव स्वरूपतः अज व अमर आहे. जेव्हां तो मर्त्य देहांत प्रवेश करतो, त्यावेळीं तो जन्मास आला व ज्यावेळीं तो शरीरांतून बाहेर पडतो त्यावेळीं तो मेला असें आपण म्हणतों. अद्वैतवादीहि जीव आणि ईश्वर ही निराळीं तत्त्वें मानतात. त्यांच्या मतेंही हा ईश्वर स्वतंत्र सर्वज्ञ असून तो मायेचें नियंत्रण करणारा आहे. व जीव अल्पज्ञ, ईश्वराच्या अधीन आहे. अद्वैत्यांची माया हीच भागवतांची श्रीहरिप्रिया महालक्ष्मी होय. द्वैती व अद्वैती यांच्यामध्यें विशेष दिसून येतो तो हा कीं, जीव व ईश्वर या दोन तत्त्वांपलीकडे निर्गुण निराकार परब्रह्म म्हणून आणखी एक तत्त्व आहे व हा ईश्वरही अखेर परब्रह्मामध्यें लीन होतो असें अद्वैतवादी मानतात.

## अन्ते मतिः सा गतिः

अन्तकाळाचे वेळीं प्राण्यास ज्या वस्तूचें स्मरण होतें त्या रूपास तो जाऊन मिळतो असा समज आहे. त्याला भगवंताचें स्मरण झालें तर तो भगवद्धावास प्राप्त होईल. निर्गुणोपासका निर्गुणमुक्ति। सगुणमुक्ति ज्याला सगुण भक्ति। अन्य देवता भक्ता व्यक्ति। त्याचि देवाची॥ मनुष्याला एखाद्या चतुष्पाद प्राण्याचें स्मरण झालें तर, त्याला त्या चतुष्पाद प्राण्याचा जन्म येईल. भरत राजा विवेकी उदंड। ज्याच्या नांवें हें भरतखंड। तो हरिण शिशु आठवितां अखंड। हरिणची अंतीं झाला। ह्या महापराक्रमी ऋषभसुत भरतराजानें आपलें समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य टाकून केवळ भगवद्भक्तीकरितां अरण्याचा आश्रय केला. तो त्याच जन्मांत मोक्षास जावयाचा परंतु विधिलिखित निराळें होतें. एकदां तो गंगा, नदींत स्नान करीत असतां त्यानें अकस्मात सिंहाची आरोळी ऐकिली. आजूबाजूस पहातो तों आसन्नप्रसव अशी एक हरिणी सिंहाच्या भीतीनें गर्भगळित

झाली. पाण्यांत तिचा गर्भ पडला. दयार्द्र अंतःकरणानें भरतानें तें पोर बाहेर काढलें. पण हरिणी तेथून भीतीनें केव्हांच नाहींशी झाली होती. भरतालाच त्या अतिदीन मातृविहीन पोराचा सांभाळ करावा लागला. होतां होतां त्याची त्या हरिणावरची ममता वाढत गेली व त्याचें मनच मृगमय झालें. त्यांतच त्याचा अंत झाला व पुढील जन्म त्याला मृगाचा प्राप्त झाला. त्या जन्मांत त्याला भगवंताचें स्मरण असल्यामुळें पुनः मनुष्य जन्म लाभला. हाच पुढें जडभरत म्हणून प्रसिद्ध झाला व त्याच जन्मांत त्याला मोक्षाची प्राप्ति झाली. यासाठींच भगवान् श्रीकृष्ण भगवद्गीतेंत सांगतात—

अंतकालेच मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरम्। यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ।। ९–५ तस्मात् सर्वेषु कालेषु मां अनुस्मर...

जो पुरुष माझें स्मरण करीत देहत्याग करतो तो माझ्याच साक्षात् स्वरूपाला पोंचतो. याकरितां सदोदित सर्वकाळीं माझें स्मरण कर. तेणेंकरून नित्य सुखात्मक अशी जी मुक्ति (वैकुंठ लोक) तींत मजजवळ येऊन सुख भोगशील.

## द्वैतपंथ व निर्गुणमुक्ति

निर्गुणोपासक, भक्ति हें ज्ञानाचें साधन मानतात तर सगुणोपासक ज्ञानाला भक्तीचें साधन मानतात, पहिला पक्ष म्हणतो, 'ज्ञानेन व हि कैवल्यं' ज्ञानानेंच मोक्ष मिळतो तर दुसरा पक्ष म्हणतो भक्तीनेंच मोक्ष (वैकुंठवास) मिळेल. दोन्ही पक्ष कर्मापेक्षां ज्ञानाची योग्यता अधिक मानतात. वैष्णवांच्या सिद्धान्ताप्रमाणें भगवंताचे ठिकाणीं अनन्यभक्ति ठेवणारांस हें ज्ञान प्राप्त होतें. ह्या ज्ञानालाच भगवान अद्वैत अथवा आत्मज्ञान म्हणतात. 'ऐसा सर्वज्ञ आत्मज्ञानी । वासुदेव अवघा म्हणोनी । आत्मरत अद्वत भजनीं । तोचि भक्त ।। जड चतन्य सर्वही । चराचर आकार जितका कांहीं । वासुदेवांचूनि नाहीं । तोचि भक्त ।। आत्माचि ब्रह्म निराकार । तोचि नित्यमुक्त परमेश्वर । साकारी देखे निराकार । तोचि भक्त ।। शुद्ध सत्त्व ब्रह्माची केवळ । साकार दिसे भक्तवत्सल । गुणत्रयाचा विटाळ । जेथें नसे ।। (निगमसार) ज्याला ज्ञानमार्गी निर्गुण ब्रह्म म्हणतात त्यालाच भक्तिमार्गी श्रीहरिरूप सगुण ब्रह्म मानतात. 'ब्रह्मैव तेन गंतव्यं' या गीतेंतील पदावर टीका करतांना वामन पंडित म्हणतात. 'ब्रह्मैव तेन गंतव्य' म्हणोनी । सगुण ब्रह्म सूचवूनि । ऐसें निगुण प्राप्ती करूनी । भजतां पावावें ब्रह्मसगुण ।। सगुण म्हणावें नांवें । परी सगुणत्वही ब्रह्म एव ।। ज्ञान हें भक्तीचें साधन मानल्यामुळें अगोदर निर्गुण ब्रह्माचें म्हणजे अज, अव्यय अशा श्रीहरीचें ज्ञान संपादन करावें. ह्याचाच अर्थ सर्व प्राण्यांशीं आत्मत्वानें वागावें. 'विद्या विनय संपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाकेच पंडिताः समदर्शिनः ।।' भ. गी. प्रत्येक प्राण्याचे ठिकाणीं सर्वांतर्यामी ईश्वर स्वरूप अंशानें आहे. त्यामध्यें भेदाभेद नाहीं, अशा वृत्तीनें वागणें हें अपरोक्ष ज्ञान प्राप्तीचें एक साधन आहे. 'असोनि निर्गुण ज्ञान । निर्गुणत्वें सगुण ध्यान । करितां नित्य सुखानुभव निधान । सगुणमुक्ति ऐसें श्रुति बोले ।।' जगाचा बाध करून परमात्म्याकडे पाहण्यापेक्षां परमात्मा म्हणजे

श्री वासुदेवच सर्व विश्वांत भरून राहिला आहे असें समजणें म्हणजे जगांतच राहून जगाकडे समदृष्टि ठेवून वागण्याच्या पद्धतीनें सामान्य माणसाच्याच काय, पण जीवन्मुक्ताच्या आयुष्यालाहि पूर्णता येते असें द्वैतमार्गांतील थोर थोर अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे. 'सर्व प्राण्यांच्या अंतर्यामी वास करणारा उत्तम पुरुष जो भगवान त्या भगवंताच्या केवळ गुणानुवाद श्रवणानेंच कोणत्याहि फलाची इच्छा न करतां आणि भेदबुद्धीचा स्पर्श न होऊं देतां व व्यावहारिक अडचणी न जुमानतां भगवद्भक्तीची दृढ कास धरून राहणें ही निर्गुणभक्ति होय. त्यांना सालोक्य, सार्ष्टि, सामीप्य व सारूप्य या चार मुक्ति देऊं केल्या तरी ते घेत नाहींत. त्यांना भगवान् सेवेवांचून अन्य कांहीं नको असतें. हाच आत्यंतिक भक्तियोग होय. या आत्यंतिक भक्तियोगानें मनुष्य त्रिगुण कार्यभूत संसारसागराचें उल्लंघन करून ब्रह्मस्वरूपाप्रत पोहोंचतो.' (वेदान्तप्रदीप.)

## सायुज्यता

निर्गुणमुक्तीला सायुज्यता असें दुसरें नांव आहे. या स्थितीमध्यें पुनर्जन्म नसल्यामुळें दुःखाचा नाश होतो खरा परंतु तेथें सुखाचाहि अनुभव राहात नाहीं म्हणून ज्ञानी भक्त ईश्वराजवळ मुक्ति न मागतां भक्तिच मागतात. भक्तीमुळें त्यांस देहपातानंतर सगुण मोक्ष अथवा वैकुंठवास प्राप्त होतो. असें भागवत पंथ सांगतो. शंकराचार्यांचें मत याच्या उलट आहे. त्यांच्या मतें सायुज्यता प्राप्त झालेल्या ज्ञान्याला आत्यंतिक सुखाची व शाश्वत दुःखाभावाची प्राप्ति होते. तैत्तिरीय उपनिषदांतील आनंद मीमांसा प्रकरणांत सांगितलें आहे, 'कोणा एका बलवान्, दृढस्वभावी, वेदाध्ययन केलेल्या तरुणाला पृथ्वीचें राज्य मिळालें म्हणजे जो आनंद होतो तो एक मानुषानंद होय. शंभर मानुषानंद म्हणजे मनुष्य—गंधर्वांचा एक आनंद. आनंदरूप ब्रह्म जाणणाऱ्या निष्काम श्रोत्रियाला हा आनंद होतो. मनुष्य गंधर्वांच्या शंभरपट देवगंधर्वाला, देवगंधर्वांच्या शंभरपट ज्यांना पुनरावृत्ति नाहीं अशा पितरांना आनंद होतो. त्यानंतर आजानदेव, कर्मदेव, देव, इंद्र, बृहस्पति, प्रजापति यांच्या यथाक्रम प्रत्येकाच्या शंभरपट आनंद म्हणजे ब्रह्मानंद होय.' ब्रह्माचा साक्षात्काररूपी आनंद जो जाणतो त्याला कसलेंहि भय राहात नाहीं. म्हणूनच 'आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन'। असें म्हटलें आहे. पण वामन पंडित म्हणतात। जे टाकुनी सगुण। ध्याती केवळ शुद्ध निर्गुण। त्यांसही प्रवेश ऐसा, परी खूण। न कळे ऐशा ऐश्वर्यभोगाची॥ हा भक्तियुक्त प्रवेश। सगुण मोक्ष यास म्हणे हृषीकेश। निर्गुणमोक्षीं अनुभव लेश। नसे स्वसुखाचा निधर्मी॥ निर्गुणसायुज्यतेंत सुखाचा अनुभव येत नाहीं—कारण निर्गुण हें पूर्णतया निधर्मी आहे. आणि सुख, आनंद हे धर्म आहेत. पण ज्ञानी परमात्मा हा आनंदरूप आहे असें मानतात. दोन्ही पक्षांच्या मतांत विप्रतिपत्ति असणार हें उघड आहे. ज्ञानमार्गी आचार्यांच्या मतें जीवात्मा परमात्म्याचे ठिकाणीं पूर्णपणें लय पावत असल्यामुळें 'ब्रह्म ब्रह्मैव भवति' या श्रुतिवचनानुसार परमात्म्याचे सर्वच गुण

जीवात्म्यामध्यें येणार हें उघड आहे. आतां जीवात्म्याला परमात्मा झाल्यावर परामुक्तीचा हा आनंद कसा भोगता येईल अशी शंका द्वैतवाद्यांकडून उपस्थित केली जाते. तुकाराम महाराज म्हणतात, ' न लगे तो मोक्ष मज सायुज्यता । नावडे हे वार्ता शून्याकारी ॥ अद्वैताच्या ठिकाणीं आनंदभोग नाहीं असें म्हणणाऱ्यांना श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं फार पूर्वींच मार्मिक उत्तर देऊन ठेविलें आहे. ते म्हणतात, शंका काढणारा अशी शंका काढतो कीं ऐक्य पावल्यावर त्याचा भोग कसा घेतां येईल ? त्याला उत्तर असें कीं शब्दानें शब्दाचा उच्चार कसा करतां येईल ? ज्याच्या अंगीं राजेपण नाहीं, त्याला राजा राजेपणाचें सुख काय भोगतो हें कसें कळेल ? त्याला राजाच झालें पाहिजे. जो स्वतः आकाश झाला नाहीं त्याला आकाशाची व्याप्ति कशी कळेल ? ' जो मद्रूप (श्रीकृष्ण) झाला नाहीं त्याला मी कसा आहें, मी केवढा आहे हें कसें समजणार ?' तरुण व्हावें तेव्हांच तारुण्याचा अनुभव घेतां येतो. तद्वत् ब्रह्मानंदाचा आनंद भोगण्यास ब्रह्मच झालें पाहिजे. ' ज्ञानेश्वरी XVIII—११४२...द्वैतांत भक्तीचा आनंद भोगतां येतो हें खरें, पण श्रीविष्णूच्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान व आकाराचा प्रचंड विस्तार इत्यादिकांची कल्पना व आनंद व्यष्टिगत भक्तास कसा मिळेल ? त्याला प्रत्यक्ष श्रीविष्णूच झालें पाहिजे. सगुण भक्तांच्याहि दृष्टीनें विष्णुस्वरूप हें ज्ञानस्वरूप आहे. विष्णु किंवा विठ्ठल नामरूप रहित आहे, अज आहे, अव्यय आहे मग भेद राहिला कोठें ? आणि असल्यास

स्था. १९२०
ओ. बी. पेंडुरकर आणि कं.
सोने चांदीचे
व
हिरे मोत्यांचे व्यापारी
मुगभाट, गिरगांव : केळकर रोड, दादर
मुंबई ४ : मुंबई २८
टे. नं. ६०४१६

कितीसा राहिला ? 'रूपा नाहीं ठाव नांवा। तैसें आमुचें करिसी देवा॥ तु. गा. २२६३' (शं. पां.) तुकाराम महाराज जेव्हां 'न लगे मुक्ति धनसंपदा' म्हणतात, तेव्हां ते श्रीविठ्ठलाच्या नामामृत सुखाच्या अपेक्षेनें म्हणतात हें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यांना मुक्ति सुख नको, तसा त्यांना वैकुंठवासहि नको. काय वैकुंठ बापुडें। तुझ्या प्रेमसुखापुढें ॥ २९१५ ॥ तुझ्या नामाचा विश्वास। आम्हां कैंचा गर्भवास॥२९७९॥ ते म्हणतात, सकल इंद्रियें झालीं ब्रह्मरूप। ओतलें स्वरूप माजी तया। तुका म्हणे चित्त करावें निर्मळ। येऊनि गोपाळ राहे येथें ॥ गोपाळच येथें आल्यावर मग वरती वैकुंठास जाण्याचें कारण काय ? आणि इंद्रियें ब्रह्मरूप झाल्यावर 'मोक्ष इहैव अवशिष्यते' मोक्ष येथेंच पृथ्वीवर आहे हें वचन निरपवाद नव्हे काय ?

## मोक्ष अथवा सगुणमुक्ति

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ सर्वविश्रुत आहेत. हे चारी पुरुषार्थ संपादन करण्यांत मनुष्यप्राण्याची इतिकर्तव्यता आहे. हेंच भागवत धर्माप्रमाणें अध्यात्मशास्त्राच्या भाषेंत बोलायचें झाल्यास धर्म म्हणजे कर्मसमर्पण, अर्थ म्हणजे निर्गुण ज्ञान, काम म्हणजे सगुण भक्ति व मोक्ष म्हणजे सगुणमुक्ति असें म्हणतां येईल. हे चार पुरुषार्थ सगुणोपासकानें प्राप्त करून घेणें हें त्याचें कर्तव्य ठरतें. मोक्ष म्हणजे सगुणमुक्ति ही कल्पना स्वीकारल्यामुळें व ज्ञान हें भक्तीचें साधन ठरविल्यामुळें निर्गुण ज्ञानाची पायरी सगुणभक्ति व सगुणमुक्ति यांच्या खालीं येणें साहजिक आहे. 'न तस्य प्राणा उत्क्रामंति। इहैव स विलीयते' ॥ श्रुति ॥

ब्रह्मज्ञान्याचें आयुष्य संपल्यावर त्याचे प्राण निघून जात नाहींत तर ते स्वरूपींच लय पावतात. त्याचे अगोदर तो उन्मनी अवस्थेंत असतो, पण सगुण ब्रह्माच्या उपासनेमुळें मन कायम राहूनच भक्तास ईश्वरसायुज्य प्राप्त होत असतें. त्यांना जगद्व्यापार वर्ज असें अमर्याद ऐश्वर्य प्राप्त होतें. विश्वाची उत्पत्ति, स्थिति लय हीं कार्यें नित्यसिद्ध असलेल्या ईश्वराचींच आहेत आणि त्याचें कारण उघड आहे. सगुण ब्रह्मोपासकांचें मन मुक्तीनंतर कायम असल्यामुळें जगद्व्यापाराविषयीं विरोध येण्याचा संभव आहे. सर्वच जीव ईश्वरावर अवलंबून असल्यामुळें जगताच्या उत्पत्तिस्थितीचा व्यवहार ईश्वराकडेच असणें पूर्ण तर्कशुद्ध होय. ह्याप्रमाणें हे जीव मुक्त झाल्यानंतर त्यांना साधर्म्य म्हणजे चतुर्भुजरूप व जन्ममरणरहित असे समानधर्म प्राप्त होतात. भगवान् श्रीकृष्ण म्हणतात, इदंज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः। सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथंति च॥ भ-गी. XIV 2. हें ज्ञान प्राप्त झाल्यावर भक्त सृष्टीच्या उत्पत्तिकालीं जन्म घेत नाहींत व प्रलयकाळींही दु:ख पावत नाहींत; ते नित्यमुक्त असतात. येथें नित्यमुक्त याचा अर्थ थोड्या निराळ्या अर्थानें घेतला पाहिजे. जे सगुण मूर्तीचें ध्यान करतात त्यांना सगुणमूर्तीचे धर्म प्राप्त होतात. ते वैकुंठनाथाच्या समीप येतात. सगुणाच्या ध्यानानें ज्ञान्यास सालोक्यहि प्राप्त होतें. त्यांचा आनंदानुभव

अखंड राहतो. पण ईश्वरालाहि निरनिराळ्या काळीं धर्माचें संस्थापन, साधूचें रक्षण व दुष्टांचें निर्दालन इत्यादि लोकोपयोगी कार्यांच्या निमित्तानें या पृथ्वीतलावर अवतार घ्यावा लागतो. त्या त्या वेळीं ईश्वर साम्य पावलेल्या मुक्त सगुणभक्तांसही उदय आणि लय प्राप्त होतात. तेही अवतार घेतात आणि संपवितात. ज्ञानमार्गी मुक्तांस ही भानगड नाहीं. एकदां मुक्त म्हणजे कायम मुक्त. सगुणभक्तांस वैकुंठ लोकास गेल्यावर सदेह (चतुर्भुजधारी) प्राप्त होतो. पण हे अवतार घेणें आणि संपविणें म्हणजे सामान्य माणसाचें जन्म-मरण नव्हे हें लक्षांत घेतलें पाहिजे. सृष्टीच्या उत्पत्तीनंतर ईश्वर अवतार घेतो. म्हणजे तो गर्भवास भोगून जन्मास येतो किंवा प्रलयकाळीं तो साकार राहतो असें नाहीं, म्हणून त्याला अज, अव्यय असें म्हणतात. आपल्या चर्मचक्षूंना जें त्याचें रूप दिसलें तोच त्याचा जन्म. सगुणभक्तही निराकार होऊन परमेश्वराचे ठिकाणीं राहातात. अवतार घेण्याचेवेळीं अव्यक्ताचे व्यक्त होतात. म्हणूनच त्यांचे संबंधीं भगवद्गीतेंत ‘ सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथन्ति च ’ असें म्हटलें आहे. वामन पंडित म्हणतात—

करी योगनिद्रा हरी शेषशायी। लयीं नीजती मुक्त त्याचेचि ठायीं॥ करी सृष्टि होऊनि जागा मुरारी। तयीं ऊठती मुक्त ही त्या प्रकारीं॥ (नामसुधा) वैकुंठ आणि वैकुंठवासी यांचे आकार त्यावेळीं शुद्ध सत्वाचे झालेले असून श्रीहरि योगनिद्रेपासून जागे होऊन उठतांच हे सर्व मुक्तही त्याबरोबर प्रकट होतात.

## वैकुंठ लोक

भगवद्भक्त सगुण ध्यानानें मुक्त झाल्यावर वैकुंठ लोकास जातात. तेथें ते


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,

श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या–चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लप्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

श्रीविष्णूशीं साधर्म्य पावतात. या वैकुंठाचें वर्णन यथार्थदीपिकेत केलें आहे.

जें वैकुंठभुवन। वैकुंठ अवतारीं कमलनयन। निर्मिता झाला नूतन। प्रार्थनें करूनि लक्ष्मीच्या॥ ज्ञानावांचूनि भक्तजन। पावती तें वैकुंठ भुवन। ते स्थळीं मधुसूदन। द्वारपाळ करी तयातें॥ एक वैकुंठ लोक। नगररूप उत्तमश्लोक। तो अनाद्यनं विशोक। ज्ञानी भक्तची पावती॥ यावरून वैकुंठ लोक दोन आहेत, असें पुराणावरून सिद्ध होतें. ज्ञानी भक्त जुन्या वैकुंठाला म्हणजे श्रीविभागाला जातात. विष्णूच्या अनेक अवतारांपैकीं एक अवतार विकुंठेच्या पोटीं झाला. तेथें त्यानें लोकाकार घेऊन वैकुंठ लोक निर्माण केला व विकुंठेचा पुत्र म्हणून वैकुंठ नांवानें प्रसिद्ध झाला. गजेंद्र मोक्षाची कथा दोन तीन प्रकारांनीं सांगितली जाते. पद्मपुराणाप्रमाणें देवहूतीपासून कर्दममुनीला दोन मुलगे झाले. त्यांचीं नांवें जय आणि विजय. एकदां हे दोघे भाऊ मरुत्त राजाच्या यज्ञानुष्ठानासाठीं गेले असतां त्यांची यज्ञाच्या दक्षिणेनिमित्त भांडणें होऊन त्यांनीं एकमेकांस रागाच्या आवेशांत शाप दिले. त्यामुळें एक हत्ती झाला व दुसरा नक्र होऊन गंडकी नदींत राहिला. पुढें एके वेळीं हत्ती नदीचें पाणी पीत असतां नक्रानें त्यास धरिलें. एक सहस्र वर्षें दोघांचें युद्ध चाललें. अखेर गजेंद्रानें श्रीमुकुंदाचा धांवा केला असतां त्यानें त्यास सोडवून नक्रास आपल्या चक्रानें फाडून टाकिलें. नक्र व गजेंद्र हे दोघेही पूर्वजन्मींचे ब्राह्मण भगवत्परायण असल्यामुळें श्रीहरीनें या दोघांस आपल्यासारखें चतुर्भुजरूप देऊन त्यांस ज्ञानहीन भक्तांकरितां निर्माण केलेल्या नूतन वैकुंठाचे द्वारपाळ नेमिलें. पुढें एका प्रसंगीं ब्रह्मदेवाचे सनकादिक पुत्र वैकुंठास गेले असतां या जयविजयांनी त्यांस आंत जाण्यास मज्जाव केला. तेव्हां त्यांस राग आला त्यांनीं तुमचें देवत्व जाऊन असुर योनींत तुम्ही तीन वेळां जन्म घ्याल असा शाप दिला. ह्या शापामुळें ते अनुक्रमें हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु, रावण व कुंभकर्ण, व शिशुपाळ दंतवक्र झाले.

महाभारतांतील शांतिपर्वांत ही कथा निराळ्या तऱ्हेनें सांगितली आहे. गायनवादनांत अत्यंत निष्णात असे हा हा व हू हू नांवाचे दोन गंधर्व होते. गायनवादनांत आपणापैकीं श्रेष्ठ कोण याचा निर्णय घेण्याकरितां ते इंद्राच्या आज्ञेवरून देवल मुनिकडे गेले. देवल मुनि त्यावेळीं ध्यानस्थ होते. त्यांच्या उद्धट वर्तनावरून देवलानें त्यांस शाप दिला. त्यामुळें एक हत्ती व दुसरा नक्र झाला. शेवटीं विष्णुदर्शनामुळें ते दोघे स्वर्गाला गेले. असो.

प्रस्तुत विषयाशीं जय विजयाचाच संबंध आहे. एकदां वैकुंठाला गेल्यावर ते तेथून पतन कसे पावले, याचें उत्तर ते ज्ञानी भक्त नव्हते. म्हणून त्यांना नव्या वैकुंठाचें द्वारपाळपद मिळालें. वैकुंठाचे तीन भाग आहेत. 'श्री, भू दुर्गा भाग हे तीन जेथें। श्रीवैकुंठीं पावती धन्य तेथें। ज्ञानीभक्त श्रीविभागास जाती। तैशा स्थानालागी गेला द्विजाति॥' (नामसुधा.) पण अजामिळ ज्ञानीभक्त असल्यामुळें

त्यास श्रीविभाग–अनाद्यनन्त वैकुंठ लोक प्राप्त झाला. अजामिळ हा कान्यकुब्ज देशांतील अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा. आरंभीचे कांहीं दिवस बरे गेले. पण पुढें तो दुर्व्यसनी निघाला. आपलीं वृद्ध मातापितरें व गृहदक्ष पत्नी टाकून तो एका शूद्र स्त्रीच्या नादीं लागला. तिच्या समागमें विषयसेवन करण्यांत त्यानें आपलें अमूल्य आयुष्य घालविलें. तिच्यापासून झालेल्या मुलांत नारायण नांवाचा कनिष्ठ मुलगा होता. तो त्याचा फारलाडका होता. त्याला नारायणाचा आणि त्यामुळें नारायण नांवाचा छंदच लागला होता. अठायशाव्या वर्षी त्याचें थोडें आयुष्य शिल्लक असतांनाहि विष्णूच्या मायेनें त्याला यमलोकास नेण्याकरितां यमदूत आले. नारायण नामाच्या प्रभावानें त्याच वेळीं त्याला वैकुंठास नेण्याकरितां विष्णूदूतहि आले. दोन्ही पक्षांचा संवाद अजामिळास ऐकायला मिळाल्यामुळें अजामिळास उपरति झाली. वैराग्य प्राप्त झाल्यावर तो सर्वसंग परित्याग करून गंगाद्वारीं गेला व तेथें भक्तियुक्त अंतःकरणानें ईश्वराचें आराधन करूं लागला. इंद्रिय दमन करून तो आत्मस्वरूपीं रममाण झाला. परब्रह्मस्वरूपीं ऐक्य झाल्यावर विष्णुदूत पुनः त्यास विमानांत बसून न्यावयास आले. अजामिळानें तात्काळ त्या गंगातीर्थांत शरीर टाकून भगवंताच्या पार्श्वदाचें स्वरूप धरिलें व विमानांत बसून तो आकाशमार्गे अनाद्यनंत वैकुंठास गेला, असें श्रीमद्भागवतांत वर्णन आहे. वामन पंडितांच्या नामसुधेंत ही कथा अत्यंत गोड वाणीनें वर्णिली आहे. ती जिज्ञासूंनीं मुळांत जरूर वाचावी.

श्रीरामानुजांच्या मताप्रमाणें हें वैकुंठ शुद्धसत्वाचें बनलें आहे. हें शुद्धसत्व त्रिगुणात्मक प्रकृतीहून भिन्न आहे. ह्या शुद्धसत्वाला स्वच्छद्रव्य किंवा नित्यविभूति असेंही म्हणतात. वैकुंठ व मुक्त झालेले वैकुंठवासी यांचे आकारही शुद्धसत्वाचे बनतात (पुरुषार्थ दीपिका). अशा त्या वैकुंठाचें वर्णन एकनाथ महाराजांनीं आपल्या भागवतावरील टीकेंत केलें आहे.

'आतां वैकुंठींची स्थिति । ऐक सांगेन तुजप्रति । जे ऐकतां चित्तचित्तीं । स्वानंदस्फूर्ति वोसंडे ।। चैतन्यचो निश्चितें । मुसावूनि श्रीभगवंतें । वैकुंठ रचिलें तेथें । निजसामर्थ्यें नांदावया । ते वैकुंठीं पाहातां


सर्वच शिंपी
कपडे
शिवतात !



पण—धी टेलर आणि कंपनींत शिवलेले कपडेच लोकांना आवडतात. शिवाय इतर कापडाबरोबर जगप्रसिद्ध मद्रास मिल्सचें कापड मिल कंट्रोल भावानें मिळत असल्यानें सोईचें पडतें. शिवाय अनेक लहानमोठे रेडिओ बृहन्मुंबईपुरते अत्यंत सवलतीच्या हप्त्यानें मिळूं शकतात. विशेष माहितीकरितां आजच भेटा,



धी टेलर आणि
कंपनी
ताराबाग समोर,
सेंट्रल सिनेमा गल्ली
चर्नी रोड, मुंबई ४

साचार। अवघे चतुर्भुज नर। घनश्याम पीतांबरघर। शंखचक्र अवघ्यांशीं॥ अवघ्यांचे एकस्वरूप। अवघे दिसती एकरूप। जेथ हरी नांदे स्वयें सद्रूप। तेथ कोणी कुरूप दिसेना॥'

तें वैकुंठ जाण साचर। सर्व लोका वरिवर। त्याहूनि परतें नाहीं पर। यालागीं परात्पर म्हणती त्यातें॥ यालागीं म्हणती वैकुंठ लोक। नित्य देखती हरीचे पाय। क्षुधा, तृषा जिरोनि जाय। तेथें मोह क्लेश कैंचा राहे॥ जेथें उगम नाहीं मायेचा! तेथें रागद्वेषे ठाव कैंचा। परमानंदें पूर्ण साचा। हरिप्रियांचा समूह नांदे॥

'भक्तिज्ञान व वैराग्य यांचा लोप होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच मुक्तही सगुणमोक्ष देणाऱ्या भागवत धर्माचें स्वतः आचरण करून जनांस सन्मार्ग दाखविण्याकरितां वैकुंठाहून येऊन मृत्युलोकांत जन्म घेतात व जगदुद्धाराचा संकल्पित कार्यभाग झाल्यावर पुनः वैकुंठास जातात.' (पुरुषार्थ दीपिका) तुकाराम महाराज हे या हरिप्रियांच्या वर्गातील होते. ते स्वतःचा अनुभव सांगतात:—

तुम्हां सांगावया कोणतें कारण। आलों वैकुंठाहून याच कामा॥ कली माजी झाल्या पातकाच्या राशी। म्हणोनी आम्हासी पाठवीलें॥

संत सेना न्हावीही आपला असाच अनुभव सांगतात—असतां वैकुंठाशीं। काय सांगे हृषीकेशी। जाऊनि मृत्युलोकाशीं। जन भक्तीसी लावी कां॥ आज्ञा वंदूनियां शिरीं। जन्मलों न्हावी—याचे उदरीं। वाचें नाम निरंतरी। रामकृष्ण गोविंद॥

आम्ही जातों आमच्या गांवा।
आमचा रामराम घ्यावा॥

तुकाराम महाराज आपल्या गांवाला प्रथमच जात नसून ज्या ठिकाणाहून ते मुक्तावस्थेंतून आले, त्या वैकुंठास परत जाण्याकरितां ते निरोप मागत आहेत.

यावरून भक्तिमार्गाला साध्या भक्तीहून ज्ञानभक्तीची श्रेष्ठता, प्रळयकाळांत ईश्वराचें निर्गुण निराकार व अविकारी स्वरूप भक्ताचे शुद्धसत्वात्मक देह आविर्भाव व—तिरोभावरूप जन्ममृत्यु इत्यादि गोष्टी मान्य आहेत असें दिसतें. वरवर पाहणाऱ्यांना द्वैत व अद्वैत संप्रदायांच्या मार्गांत फार मोठें अंतर आहे असें दिसतें तरी विचारवंतांस हे दोन्ही मार्ग सर्वच ठिकाणीं समांतर रेषेंतून न जातां अनेक ठिकाणीं एकमेकांस भिडून जातात असें आढळून येईल.

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
मे. **कांचनलाल वाडीलाल कं.,**
दवाबझार, मुंबई २

एक उद्बोधक आख्यायिका

# शिकंदराचा लोभ

शिकंदर बादशहा अजिंक्य होता. त्यानें देशचे देश पादाक्रांत केले. चांगल्या वाईट प्रकारांनीं जनतेला लुटून धन गोळा केलें. कोणाकडे तांब्याचा पैसा शिल्लक ठेवला नाहीं. धातूचा पैसा गोळा करून त्याऐवजीं त्यानें चामड्याचें नाणें सुरू केलें. तांब्याचें नाणें चलनांतून गेलें म्हणून प्रजेनें होता तो सर्व पैसा सरकारी खजिन्यांत भरला. तरीहि चुकून कोठें शिल्लक राहिला असेल तर तो पैसाहि खजिन्यांत आला पाहिजे, अशी तीव्र लालसा शिकंदरास उत्पन्न झाली. परंतु तो मिळविण्यासाठीं एखादी नवी कल्पना काढण जरूर होतें, बरीचशी लालूच दाखविणारा प्रयोग करणें जरूर होतें. बादशहाचा हुकूम झाला, आणि एक पुष्टसा किंमती उंट, उंची वस्त्रें आणि भरपूर दागिन्यांनीं भूषविलेली एक देखणी वेश्या, बक्षिसासाठीं जाहीर झाली! बक्षिसाची शर्त आश्चर्यकारक होती. या सर्व वस्तूंचें बक्षिस तांब्याच्या एका पैशाच्या मोबदल्यांत मिळणार होतें! कोणीहि तांब्याचा एक पैसा आणून द्यावा आणि उंट व वेश्या हीं घेऊन जावीत असा शिकंदराचा हुकूम होता.

तांब्याच्या एका पैशाला इतका मोबदला द्यायला बादशहा तयार झाला यावरून त्याचा लोभ कमी झाला होता असें समजूं नका. एवढ्याशा किंमतींत इतकें मोठें बक्षीस मिळणार या आशेनें कोणीतरी न्याय्य अन्याय्य जिवापाड खटपट करणारच व त्याच्याकडून तो पैसा कोठें राहिला, कसा राहिला हें कळेलच असा बादशहाचा डाव होता. त्या गुप्त असलेल्या पैशासाठींच हा अभिनव हुकूम बादशहानें काढला होता.

शहरांत दवंडी पिटली गेली—एक तरूण सुंदर स्त्री आणि किंमती उंट तांब्याच्या एका पैशाच्या मोबदल्यांत मिळणार! चौका चौकांतून लोकांचीं टोळकीं जमा झालीं. एका पैशांत या वस्तू मिळायच्या. प्रत्येक जण आपल्या-पाशीं कुठें तांब्याचा पसा आहे का हें शोधशोधून पाहूं लागला – पण कुणाच्याच कनवटीस पसा नव्हता. झाडून सारीं नाणीं आधींच खजिन्यांत गेलेलीं. पसा कुणाला मिळणार कुठें?

एका तरुणानें ही दवंडी ऐकली. तो बक्षिसाचा उंट व वेश्या मिळविण्यास आतुर झाला. त्यानें आपलेच केवळ नव्हे तर इतरांचेहि खिसे चांचपले! एका

तांब्याच्या पैशाची त्यानें भीकहि मागितली. ज्याच्याकडे त्यानें भीक मागितली तो हंसून म्हणाला, "अरे वेड्या! माझ्याकडे जर पैसा असता तर मीच नसता का हा बक्षिसाचा मोका साधला?"

त्या तरुणानें हरतऱ्हेनें पैसा मिळविण्याची खटपट केली. फक्त तांब्याचा एक पैसा. पण तेवढाहि त्याला कुठें मिळेना.

सर्वत्र निराशा पदरीं पडल्यावर वीस वर्षांचा तो तरूण घरच्या म्हातारीकडे धांवला. म्हातारी वयोवृद्ध आणि अनुभववृद्धहि होती. तिनें आपल्या नातवाला जवळ बसवून त्याची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. ती म्हणाली,

'बाळ! अरे बादशहा इतका खुळा का आहे? पैसा मिळण्याची शक्यता असती तर त्यानें असा मोबदला द्यायची तयारी दाखविली असती का? या बक्षिसाच्या पाठीमागें बादशहाचें कांहीं तरी मोठें कारस्थान असलें पाहिजे. तूं या कारस्थानाला बळी पडूं नको—सोडून दे हा मोह'

म्हाताऱ्या आजीनें मुलाची समजूत पटावी म्हणून परोपरीनें त्याला सांगून पाहिलें. पण विकारानें, लोभानें नि मोहानें आंधळा झालेला तो तरुण त्याला तें शहाणपण कसें पटणार! उंट आणि सुंदर तरुणी व त्यासाठीं तांब्याचा पैसा या गोष्टीच फक्त त्याच्या डोळ्यापुढें नाचत होत्या. त्यानें म्हातारीकडे पैशाचा हट्टच धरला. 'जेवणार नाहीं, घरीं राहाणार नाहीं, आत्महत्त्या करीन' अशी त्यानें धमकीहि दिली. म्हातारीला दुःख झालें. ती रडूं लागली. तरुणाचें लक्ष म्हातारीकडे नव्हतें. त्याला हवा होता पैसा—फक्त एक तांब्याचा पैसा.

म्हातारीला सहज आठवण झाली—तिनें मुलाला सांगितलें,

'बाबारे! तुझ्या वडिलांना कबरींत पुरलें त्यावेळीं त्यांच्या तोंडांत एक पैसा ठेवलेला होता. तेवढाच एक पैसा आपला म्हणण्यासारखा घरांत राहिला आहे. तो तुला मिळूं शकेल!"

म्हातारीनें दिलेल्या या माहितीबरोबर त्या तरुणानें आपल्या बापाची कबर खोदण्याची तयारी केली!

दिवा पश्यति नोलूकः
काको नक्तं न पश्यति।
अपूर्वः कोऽपि कामांधो
दिवा नक्तं न पश्यति॥

घुबडाला दिवसा दिवस नाहीं. कावळा रात्रीं आंधळा असतो. परंतु कामांध झालेल्याची गोष्ट अपूर्व असते! त्याला दिवसाहि दिसत नाहीं अगर रात्रींहि दिसत नाहीं. तो सदा अंधच असतो!

मूल्यवान् दागिन्यांसह तरुण सुंदर स्त्री आणि एक उंट! आणि हें सारें फक्त एका पैशांत! या लालसेनें आंधळा झालेला तो तरुण कोणताहि मागचा पुढचा विचार न करतां आपल्या बापाची कबर खोदण्यास तयार झाला.

जरूर तीं हत्यारें घेऊन बापाची कबर खोदून पैसा शोधण्याचें अघोरी काम सुरू झालें. आतां त्या कबरींत हाडें नि माती एवढेंच शिल्लक उरलें होतें. त्यांत शोधशोधून त्या तरुणाला अखेर हवा होता तो तांब्याचा

एकच एक पैसा मिळाला. आनंदानें तो घरीं आला. चिंच, मीठ वगैरेंनी तो पैसा साफसूफ करून हंसतमुखानें त्या तरुणानें बाजारांतील चौकाकडे धूम ठोकली. छाती पुढें करून त्यानें तो पैसा अधिकाऱ्याकडे दिला. पैसा हातीं आल्याबरोबर तो उंट व वेश्या त्या तरुणाच्या स्वाधीन करण्यांत आलीं.

बक्षिस मिळालें पण तावडतोब त्या तरुणाला अटक करण्यांत आली आणि त्याला बादशहासमोर राजदरबारीं हजर करण्यांत आलें.

बादशहानें त्याला दरडावून विचारलें,

'पैसा कुठून आणलास ?'

तो तरूण घाबरला होता. भीतभीत तो म्हणाला,

'तो पैसा माझाच आहे. दुसऱ्या कुणाचा नाहीं. माझ्याच मालकीचा आहे. तो.'

परत बादशहानें तोच प्रश्न विचारला, चांचरत त्या तरुणानें अखेर उत्तर दिलें,

'माझ्या बापाच्या कबरींतून, त्याच्या मृत्यूनंतर पुरतांना त्याच्या तोंडांत ठेवलेला पैसा मी कबर खोदून शोधून आणला.'

बादशहाला हवी होती ती माहिती मिळाली. त्या तरुणाची मुक्तता झाली. उंट व तरुणी घेऊन तो सुखाभिलाषी तरुण आनंदानें घरीं गेला.

शिकंदरालाहि आनंद' झाला होता. त्यानें आपल्या अधिकाऱ्यांना फर्मावलें 'कबरींतून पैसा शिल्लक आहे. सर्व कबरी खोदा आणि त्यांतून मिळणारें नाणें आणून खजिन्यांत भरा.'

बादशहाच्या हुकुमाची अंमलबजावणी होणारच. सर्व जनतेला त्रास देऊन लुटून मारून जडजवाहिरांचे ढीगचे ढीग मिळवले तरी तेवढ्यानें तो समाधानी नव्हता. प्रेताच्या तोंडांत ठेवला गेलेला पैसा कबरी खोदून त्यानें जमा केला! काय ही लोभवृत्ति! लोभसागराचा अंत कधीं कुणाला लागला आहे काय ?

[ श्रीमद् विजय लक्ष्मण सूरीश्वरजी महाराज यांच्या एका प्रवचनांतून. ]

———


**ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स**

**३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.**

ARSA PRODUCTS

**❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स**

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

**रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४**

# श्री साईनाथांचें तत्त्वज्ञान

लेखक—साईभक्त

श्रीसाईनाथांचें **तत्त्वज्ञान** हें भागवत-धर्माच्या संत परंपरेंतून स्फुरलेलें, गोदावरी—अमृत वाहिनीच्या विपुल जलानें अमृत झालेलें आहे. या तत्त्वज्ञानाची महति अगाध आहे. स्वतंत्र भारताचें **भारतीय तत्त्वज्ञान** ह्या दृष्टीनें सद्यःस्थितींत याचें महत्त्व आहे. श्रीसाईनाथ हे आदिनाथांचा अवतार. निवृत्ति ज्ञानदेवांच्या करवीं ज्याचा पाया घातला, त्याचाच कळस तुकाराम महाराज झाले; या तत्त्वज्ञानाच्या भव्य मंदिराची भारतीय अशी व्यापक सर्वसंग्राहक भरींव व प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी अशी जन मनांतील पकड श्रीसाईनाथांनीं विसाव्या शतकाचे आरंभींच निर्माण केली. **भारतीयांचें तत्त्वज्ञान** कोणतें असा प्रश्न विचारला असतां शिरडी साईबाबांचें तत्त्वज्ञान हेंच भारतीयांचे तत्त्वज्ञान होय. हिंदु, मुसलमान पारशी खिश्चन ज्यू कोणत्याही धर्माचा मनुष्य हें तत्वज्ञान आचरणांत आणूं शकतो. साईनाथांनी जी अजब किमया केली ती हीच आहे. शिरडींत सर्व धर्मांचे संप्रदायांचे आणि उपासना परंपरेंतील भारतीय येतात. साईबाबांची सेवा उपासना करून समाधान, शांति आणि इतिकर्तव्यता यांचा लाभ मिळवतात. साईबाबांचें तत्त्वज्ञान हें या दृष्टीने सर्व धर्मातीत आहे. सर्व धर्मांतील रहस्य आहे. सर्व धर्मांचें रहस्य ईश्वरप्राप्ति हेंच आहे. ईश्वराला शरण जाणें त्याची उपासना करणें, ईश्वरार्पणबुद्धीनें व्यवहारांतील कर्तव्य करीत रहाणें हें तत्त्वज्ञानाचें रहस्य आहे. ईश्वरी तत्त्वाचें ज्ञान मानवी मनाला बुद्धीला आणि जीवनाला आवश्यक आहे. ईश्वर हा सर्वव्यापी आहे. सर्व प्राणिमात्रांत, जगतांत स्थिरचर विश्वांत तो भरून राहिला आहे. श्वराला मनुष्यमात्राने प्राणिमात्रांत पहावयास शिकलें पाहिजे. ईश्वराची ओळख प्राणिमात्रांचे स्वरूपांतून झाली पाहिजे. साईबाबांनीं या ईश्वर स्वरूपाची ओळख आपल्या दिव्य दृष्टीनें आपल्या प्रखर तेजानें सर्व प्राणिमात्रांस पटवून दिली. शिरडी हें या दृष्टीनें महान् क्षेत्र आहे. सर्व धर्मांचे लोक ईश्वरार्पण बुद्धीनें या ठिकाणीं येतात. लहान मोठा, गरीब श्रीमंत उच्चनीच हे समाजांतील सर्व भेद या ठिकाणीं अभेदरूप होतात. सामाजिक जीवनाची, राष्ट्रीय साफल्याची, मानवतेच्या मांगल्याची समृद्धि येथें प्राप्त होते. साईबाबांच्या तत्त्वज्ञानाचा या दृष्टीनें अभ्यास करीत गेल्यास या तत्वानें आजच्या राष्ट्रीय पुनरुज्जीवनांत फारच मोठें कार्य घडून येईल सामाजिक जीवन—व्यवहाराला तत्त्वज्ञानाची

आत्यंतिक गरज आहे. भारतासारख्या प्रदीर्घ देशाला सामाजिक ऐक्य सांधणारें तवत्त्ज्ञान आवश्यक आहे. भारतीय हा शब्दच या तत्त्वानें तत्त्वज्ञानानें सिद्ध झालेला आहे. हा देश माझा, ही माझी जन्मभूमि, कर्तव्य भूमि, धर्माचरण करण्याची भूमि. भारतीय म्हटल्या बरोबर या अनेकविध एकत्वाचा संकलित अनुभव येतो. भारतीय म्हणजे केवळ धर्मपंथाचा अनुयायी नव्हे. ज्याच्या मनावर विचार व्यवहारांवर, नैतिक मूल्यांचा परिणाम झालेला आहे, जो सहिष्णु, शांत, सौजन्यशील, संयमी, त्यागी, निष्ठावंत व कर्तव्यदक्ष आहे तो भारतीय. भारतीय या पदाने अनेक गुणांचा त्यांनीं मानवतेंत निर्माण होणाऱ्या अनेक लक्षणांचा प्रभाव प्रत्यक्ष अनुभवितां येतो.

साईबाबांनी या दृष्टीनें शिरडीच्या महान् कर्मभूमीमध्यें या भारतीय तत्त्वज्ञानाची—सामाजिक जीवनाची पुनर्रचना केली. भारताच्या इतिहासांत अनेक कालखंड येऊन गेले. त्यांच्याबरोबर अनेक चांगली तत्त्वेंही कालाच्या ओघांत विलीन झालीं. सामाजिक अभ्युदयासाठीं


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित (मराठी) | किंमत | रु. | ७—०—० |
| (२) | सच्चरित (इंग्रजी) | ,, | ,, | ४—०—० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ—स्तवनमंजरी | ,, | ,, | ०—२—० |
| (४) | ,, (अध्याय ४) | ,, | ,, | ०—०—० |
| (५) | सगुणोपासना | | | ०—३—० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | ,, | ,, | १०—०—० |
| (७) | श्रीसाई—लीलामृत | ,, | ,, | २—०—० |
| (८) | श्री साई—सुमनांजली | ,, | ,, | ०—१—० |
| (९) | कीर्तन—पंचक ( श्री साईलीलांनीं नटलेलें ) | ,, | ,, | १—८—० |
| (१०) | शीलधी (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा—अवतार व कार्य | ,, | ,, | २—०—० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | ,, | ,, | ०—२—० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | ,, | ,, | ४—८—० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील :—

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट—शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबइ १.

लागणाऱ्या समाजनिष्ठेची—निश्चयात्मक शक्ति आवश्यक असते. साईबाबांनी या निष्ठेची हळुवारपणें जपणूक करून या निष्ठेंतून पराकाष्ठा निर्माण केली. निष्ठा आणि सबूरी ही साईबाबांची दोन तत्त्वें म्हणण्यापेक्षां तत्त्वाच्या दोन बाजू आहेत. सबूरी हा महत्वाचा टप्पा आहे. मानवी मन विरोधाला बुजतें. प्रयत्नहीन बनतें, लाचार होतें. त्या मनाबरोबर ज्ञान अनुभव व चिरंतन अशीं मूल्यें यांचीही विस्मृति होते. मनुष्यांतील चेतना नष्ट होऊन त्याचें कर्तृत्व फुकट जाते. साईबाबांनी या दृष्टीनें मानवी मनाला आचाराला, विचाराला आणि व्यवहाराला गति येईल अशा तऱ्हेनें निष्ठा आणि सबूरी यांची जोड मानवी बुद्धीला दिली आहे. जोपर्यंत प्रतिकूल परिस्थिति पालटली नाहीं, तोंपर्यंत अपेक्षित कार्य होणार नाहीं; प्रतिकारांतून अनुकलता निर्माण होण्यासाठीं निष्ठापूर्वक प्रयत्न हाच एकमेव उपाय; साईबाबांनीं या दिव्य उपदेशानें अनेकांच्या जीवनांत एकदम क्रांति घडवून आणली. ईश्वरनिष्ठांच्या मनामध्यें नैतिक निष्ठा आणि त्या दृष्टीनें नैतिक बळ फारच कमी असतें. धार्मिक मनुष्य हा मनाचा दुबळा बनतो. त्याचा प्रयत्न वेंधळा आणि भोंगळा असतो. त्याचा धर्मविषयक दृष्टिकोण आंधळा ( धर्मांध ) असतो. धार्मिकतेंतील हे दोष इतर अनेक दोषांचें पुनरुज्जीवन संथपणानें सतत करीत असतात. श्रीसाईबाबांनीं धार्मिकतेंतील या दोषमूलांवर 'मूले कुठारः' करून व्यक्तीला निर्भय बनवलें. नीतिमान् बनवलें. नीतिमान् मनुष्य सद्गतीचा अधिकारी होतो. मनुष्य नीतिमान् झाल्याशिवाय—मानवी दोषांपासून मुक्त होऊं शकत नाहीं. चोरी, चहाडी काम, क्रोध, लोभ इत्यादि विकारांपासून मुक्त होण्यासाठीं माणसाचे मनांत नीतीचें अधिष्ठान असावें लागतें. धार्मिक मनुष्य परमेश्वराला भितो. तो पापाच्या नरकाचे भयाने भितो. त्यामुळे तो दुबळा बनतो. कुरटा बनतो. घातकी, संशयी बनतो. निरनिराळ्या धर्मांतील धार्मिक लोक अशा तऱ्हेने धार्मिक असूनही आत्मोद्धारास असमर्थ असतात. त्यांचा सांप्रदाय, त्यांची उपासना त्यांचा धर्म त्यांना आत्मप्रत्यय किंवा आत्मलाभ यांसारखे ध्येयच देऊं शकत नाहीं. धार्मिकतेंतील हा मोठा दोष आहे. धार्मिक मनुष्य अकांड-तांडव करील, पण आपलें नैतिक बळ वाढवणार नाहीं.

साईबाबांचे तत्वज्ञानांत हीच नेमकी समस्या पूर्ण केलेली आहे. तुझें नैतिक गुण मूल्य वाढलें कीं त्याचा परिणाम झालाच. **तुझें आहे तुजपाशीं**—व्यक्तीचा उद्धार व्यक्तीच्या गुणांनी, कर्मांनी होतो. व्यक्तीचे नैतिक अधिष्ठानांतून या गुणकर्मांची उठावणी होत असते. साईबाबांनी व्यक्तीचा हा गुण कर्म—प्रधान पिंड पारखून निरखून त्या पिंडाला सुपिंड केला. या पिंडामध्यें सन्मति, सुविचार, सदाचार, सहकार्य, सेवा, सत्संगति, सत्यनिष्ठा, सत्यपालन इत्यादि नैतिक गुणमूल्यांची रुजवण करून जोपासना केली.

धुनीमध्यें उन्नति व सत्संगति यांची जोडी एकरूप करून ठेवली. धुनी—म्हणजे ज्ञानाग्नि. कर्तव्यनिष्ठेचा अग्नि होय. या धुनीमध्यें मानवी मन, वर्तन, आचरण यांतील दोष जळून जावयाचे. सेवा, सहकार्य, सौजन्य, शांति, सहवास, सुख

इत्यादि मौलिक गुण शिल्लक रहावयाचे-हीच उदी. उदयाला आणणारी संजीवनी. उद्वेग दूर करणारी, उपाय सुचवणारी, अपाय दूर करणारी, उपयोगी पडणारी उन्नतीस नेणारी **अशी बाबांची उदी** त्यांच्या तत्त्वज्ञानाची चिरंतन शक्ति आहे. साईभक्त हा या उदीने उन्नत झालेला, या धुनीने पवित्र झालेला असा असला म्हणजे बाबांच्या कृपेला पात्र होतो. मानवी जीवनाच्या परिपूर्णतेसाठीं बाबांची कृपा आवश्यक आहे. ही कृपा म्हणजे याद्दष्टीनें आपआपलें कर्तव्य परिपालन करण्यासाठीं, पाळावयासाठीं आवश्यक असणारी निष्ठा–आणि सबूरी यांतून मिळवावयाची आहे. साईभक्ति ही स्वार्थी भक्ति नाहीं. कामनिक भक्ती नाहीं. तो एक मानवतेचा आविष्कार आहे. त्यांत वैफल्य नाहीं. द्वेष त्वेष, ईर्षा असूयारहित असा तो आहे. सकल दोषरहित व सकल गुणांसहित व्यक्तींच्या कुटुंबाच्या:समाजाच्या राष्ट्राच्या उन्नतीसाठीं उभारलेली-प्रज्वलित केलेली संजीवनी आहे. भारतीय तत्वज्ञानांत याच तत्वांचा आविष्कार आणि पुरस्कार स्वीकारलेला आहे. **भारतीयत्व** हें या नैतिक अधिष्ठानांतून घडलेलें आहे. तें केवळ प्रांतिक, भाषिक, वांशिक किंवा धार्मिक नाहीं. त्यामध्यें भूतमात्रांविषयीं कळवळा, जिव्हाळा आणि माणुसकीचा उमाळा आहे. साईबाबांचे तत्वज्ञानांत हीच महत्वाच्या ग्रंथि आहे. साईबाबांचें तत्वज्ञान हें भारतीय तत्वज्ञान आहे असें म्हणतों याचा अर्थ असा कीं, '**भारतीय** ही **सुसंस्कारित सत्प्रवृत्त** अशी **नागरिक स्थिति** आहे. या **नागरिक स्थितीची प्राप्ती करून करून घ्यावी लागते**. साईबाबांचें तत्वज्ञानाचा अभ्यासक या दृष्टीने चिंतन करूं लागल्यास, त्याचे मनांत हें पटेल. साई तत्वज्ञानाचे अभ्यासक हे मानवतेचे सहाय्यक आहेत. विध्वंसक, आक्रमक व संहारक अशा जागतिक मनोवृत्तींचा संघर्ष अढळ आहे. स्वतःला सत्य अहिंसेचे पाईक


**जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी** ॥ ज्ञानेश्वर ॥

ही कदाचित् कविकल्पना असेल–पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचुक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तरी दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे. याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४**

यांचा सल्ला घेऊन निर्धास्त राहा.

बाहेरगांवींही फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑडरप्रमाणें पाठवूं.


समजणारे राजा आणि संपत्ति यांच्या दडपणाखालीं दडपले जात आहेत. बहुजनसमाज त्यांतील आकांक्षा, संवेदना या दडपल्या जात आहेत. अशा या संघर्षाच्या काळांत साईतत्वज्ञानाचा चिरंतन उपयोग होणार आहे. शिरडी हें भारताचें **अध्यात्म-पीठ** आहे. गेल्या १०० वर्षा पूर्वींच या पीठाचें पुनरुज्जीवन साई-नाथांनी केलें. **ना मठ** , अशा स्थितींत; याचा विचार, व्यवहाराच्या संभाव्य व्यावहारिकतेंतून करून साईतत्वज्ञानाची दिव्यदृष्टि साधकांनी साध्य केली पाहिजे. **श्रीसाईतत्वज्ञान** ही दिव्य संजीवनी आहे. भारताचे दहा वर्षांचे स्वातंत्र्योत्तर काळांत जे अनुभव आले आहेत, त्यांचा विचार करितां—स्वातंत्र्य म्हणजे वस्तुस्थिति नव्हे असें वाटूं लागतें.

**वस्तुस्थिति** आणि ती प्राप्त होण्याची **सहजस्थिति** ही कशी साध्य होईल हा प्रश्न स्वाभाविक पुढें येतो. त्या दृष्टीनें शिरडीचे या महान् द्रष्टयाने गेल्या १०० वर्षांपूर्वींच या दृष्टीनें भारतीय संस्कृतीचा निदर्शक असा महान् संप्रदाय संतांच्या परंपरेंतून त्यांच्याच कर्मभूमींत, त्यांच्याच **मार्गाधारें वर्तून** 'थोर थोर लहानथोर भलते नारी नर' या सर्वांसाठीं—खुल्या-दिलानें खुला करून ठेवला आहे आणि भारतीयांचे सांस्कृतिक मूल्य खुलविलेलें आहे. शिरडीच्या या महान् राष्ट्रसंताचें हें तत्वज्ञान भारताचें भवितव्य घडवणारें आहे, भारताच्या उन्नतींत येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढणारें, संकटांतून पार पाडणारें आणि जगत् व्यवहारांत सौजन्यानें तळपणारे असेंच आहे.

---


दिव्य दृष्टीसाठीं ! GRAM:–DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM.–DADAR)



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथ डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.**

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास

× × ×

गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता-प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

## अध्याय ८ वा

**अर्जुन म्हणाला—**

काय ब्रह्म असें तें? अध्यात्महि काय? काय तें कर्म।
अधिभूत नि अधिदैवत, भगवंता, काय यांतलें मर्म? ॥ १ ॥

अधियज्ञ कोण? कैसा? या देहामाजि जो करी वसती।
योगी यतचित्त तुला, देवा, देहान्तिं केंवि ओळखती? ॥ २ ॥

**भगवान् म्हणाले—**

श्रेष्ठ नि अविनाशी तें तत्त्व ब्रह्म, स्वभाव अध्यात्म।
भूतोत्पत्ति–समुन्नति–कर जो उद्योग नांव त्या कर्म ॥ ३ ॥

'अधिभूत' तो विनाशी, 'अधिदैवत' भाव चेतना युक्त।
देहीं 'मी' 'मी' म्हणतो तोही 'अधियज्ञ' मीच नृश्रेष्ठ ॥ ४ ॥

मातेंचि अंतकाळीं स्मरतां जो सोडुनी इथें देह।
जातो, तो मद्रूपा पावे, पार्था, न यांत संदेह ॥ ५ ॥

ज्या ज्या भावा, स्मरतां, वा, अन्तीं जीव टाकि देहास।
त्याला त्यालाची तो पावे कीं सतत लागला ध्यास ॥ ६ ॥

यास्तव नित्य स्मर मज, प्राप्त करी युद्ध हें, लढूनीही।
मन–बुद्धि अर्पुनी मज, मिळशिल मजलाच, संशयो नाहीं ॥ ७ ॥

स्थिर करुनी अभ्यासें चित्त, न मग चिंति जें दुजा विषया।
दिव्य परम पुरुषातें, ध्यातां त्याचाच लाभ, हे विजया ॥ ८ ॥

सर्वाधार, पुरातन, शास्ता, सर्वज्ञ, दीप्त भास्करसा ।
सान अणूहूनीही, दूर तमापासुनी अचिन्त्य असा ॥ ९ ॥

स्मरतां अचळ मनें, नी, भक्तीनें, प्राण दोन भुवयांत ।
आणूनी योगबळें, अन्तीं पर दिव्य पुरुष तो प्राप्त ॥ १० ॥

ज्यांत विरागी शिरती ज्यासाठीं ब्रह्मचर्य—पालन तें ।
वेदज्ञ म्हणति 'अक्षर' संक्षेपें सांगतों तुला पद तें ॥ ११ ॥

इंद्रिय—द्वारें सारीं रोखूनी, रोधुनी मना हृदयीं ।
प्राण शिरीं नेऊनी, सुस्थिर जो योग—साधनीं होई ॥ १२ ॥

स्मरतां मातें, जपतां ॐ ॐ हें अक्षरात्मक ब्रह्म ।
देह त्यजुनी जातां, लाभे गति त्यास, पांडवा परम ॥ १३ ॥

पार्था, अनन्य भावें चिंत्तिं सदा सर्वदा स्मरे मातें ।
सहजचि माझी प्राप्ती, होते त्या नित्य—युक्त योग्यातें ॥ १४ ॥

येउनि मिळति महात्मे मजला जे सिद्धि पावुनी परम ।
दुःखाचें घर, भंगुर ऐसा लाभे न त्या पुन्हां जन्म ॥ १५ ॥

सरतां पुण्य ब्रह्मादिक लोकांतून होतसे पतन ।
मातें येउनि मिळतां, परि, न पुन्हां जन्म, येइ वा मरण ॥ १६ ॥

एक हजार युगांचा मनुजांचा ब्रह्मदेव—दिन एक ।
रात्र हजार युगांची, म्हणती दिन—रात्र—जाणते लोक ॥ १७ ॥

अव्यक्तांतुनि उपजे सारें हें व्यक्त, दिवस तो येतां ।
येतां रात्र, विलीनहि त्या अव्यक्तींच होइ तें, पार्था ॥ १८ ॥

ऐसा हा भूतांचा समुदाय पुन्हां पुन्हां निशारंभीं ।
जाई विलया, विजया, अगतिक उपजे पुन्हां दिनारंभीं ॥ १९ ॥

अव्यक्त परि सनातन या अव्यक्तापलीकडे पर तो ।
सारीं भूतें झालीं नष्ट तरी जो नष्ट न हो, असतो ॥ २० ॥

ज्या अव्यक्ता 'अक्षर' म्हणती गति तोच, पांडवा, परम ।
जेथें जातां न पुन्हां जन्म, असें श्रेष्ठ धाम तेंचि मम ॥ २१ ॥

हा श्रेष्ठ पुरुष, पार्था, लभ्य परंतु अनन्य—भक्तीनें ।
ज्यामाजि सर्व भूतें हें विश्व व्यापिलें सकल ज्यानें ॥ २२ ॥

त्यजितां तनु ज्या काळीं योगी येती पुन्हां न जन्मातें ।
आणिक येती जन्मा, कथितों तो काल अर्जुना तूतें ।। २३ ।।

दिवसा नि उत्तरायणीं अग्नि ज्वाळांत, शुद्ध—पक्षांत ।
देह त्यजुनी जातां ब्रह्मज्ञ बाह्मिं लीन होतात ।। २४ ।।

धूमांत, दक्षिणायनिं, रात्रीं आणीक कृष्ण—पक्षांत ।
देह त्यजितां योगी, येती राहून चंद्र लोकांत ।। २५ ।।

हे दोन मार्ग शाश्वत जगिं या तेजस्वि आणि अंधारी ।
एकें न पुन्हां जन्मे, अन्यें घे जन्म जीव माघारीं ।। २६ ।।

हे दोन मार्ग जाणे ऐसा योगी पडेचिना मोहीं ।
म्हणुनि सदोदित पार्था या योगा आचरीत तूं जाई ।। २७ ।।

वेदांत, यज्ञांत, तपांत, दानीं ।
निर्देशिलें पुण्य—फल त्यजूनी ।
योगी पदा श्रेष्ठ नि आद्य पावे ।
हें सर्व होई जंव त्यास ठावें ।। २८ ।।

———०———

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**भास्कर लक्ष्मण नार्वेकर**

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या—चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील, तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें—चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

## धर्मपीठ आणि विद्यापीठ असलेली

# पुण्यनगरी काशी

महामहोपाध्याय द. वा. पोतदार

आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून प्रक्षेपित झालेल्या भारतांतील प्राचीन विद्यापीठ ह्या भाषणमालेंत म. म. श्री. दत्तो वामन पोतदार ह्यांचें भाषण झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत काशी विद्यापीठाची माहिती सांगितली. त्यांच्या भाषणांतील महत्त्वाचा भाग पुढें देण्यांत येत आहे.

आपल्या मराठींत अशी म्हण रूढ आहे, 'नवखंड पृथ्वी आणि दहावें काशी.' काशी हें सर्व हिंदुधर्माचें सर्वांत मुख्य धार्मिक केंद्र आहे. 'काशीस जावें नित्य वदावें,' असें प्रत्येक श्रद्धाळू हिंदु घोकीत असतो. 'काशींत मरण आलें तर माणसाचें सोनें होतें' अशीहि एक म्हण आहे.

पण काशी ही हिंदूंची धर्मपुरी आहे. विद्यापीठाशीं तिचा काय संबंध असा प्रश्न उभा राहील. त्याचें उत्तर असें कीं, आमच्या धर्मांतच शास्त्रें आणि विद्या येतात. हिंदु लोक वेद हे धर्माचे मूळग्रंथ समजतात. ह्या वेदाचीं सहा अंगें मानलीं आहेत. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त ज्योतिष, आणि छंद हीं सहा अंगें वेदान्त याप्रमाणें वेदांचें मूळ आहेत. यामुळें धर्माचें शिक्षण द्यावयाचें म्हटलें कीं त्यांत शास्त्रें आपसूकच येतात. जिथें धर्मपीठ असेल तिथें विद्यापीठ असतेंच असें समजण्यास हरकत नाहीं. काशी धर्मपीठ होतें, त्या अर्थी तें विद्यापीठहि असणारच. तेथें धर्माचे मोठे मोठे मठ असणार, मठाचे स्वामी असणार आणि स्वामींबरोबर शिष्य असणार. असें ठोकळ चित्र जर आपण उभें केलें तर त्यांत कांहीं चूक होणार नाहीं. काशीचा महिमा या दृष्टीनें खरोखरीच मोठा आहे. प्राचीनकाळीं काशी हें एकच विद्यापीठ भारतांत होतें असें नाहीं. दुसरीं पुष्कळ विद्यापीठें होतीं. धर्मपीठ म्हणजे विद्यापीठ असें आपण एकदां समीकरण मांडलें म्हणजे कितीतरी नांवें मनासमोर येतील. तथापि ज्यांना धर्मपीठ म्हणणें योग्य होणार नाहीं अशीं विद्यापीठेंहि प्राचीन काळीं भरभराटलेलीं होतीं असें दिसून येतें. ही चालतीं बोलतीं आणि जिती जागतीं विद्यापीठें विपरीत काळाच्या प्रभावांत नष्ट करण्यांत आलीं.

## काशींची विद्येची परंपरा

काशीला विद्यापीठ म्हटलें तरी काशी कांहीं नालंदा किंवा तक्षशिला यांच्या वर्गांतील विद्यापीठ नव्हतें. कारण नालंदा आणि तक्षशिला येथें हजारों विद्यार्थी एकत्र राहून शिकत असत. दहा हजार विद्यार्थी एकेकाळीं नालंदा विद्यापीठांत शिकत. त्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांतील खोल्या देखील आज आपणाला पहावयाला मिळतात. त्यावरून प्रवाश्यांनीं किंवा यूवान चॉंग सारख्या विद्यार्थ्यानें केलेलीं वर्णनें पडताळून पाहून खात्री करून घेतां येते. काशींचे तसें नाहीं. तिथें नालंदा प्रमाणें एकत्र राहून हजारों विद्यार्थ्यांनीं एका छत्राखालीं करण्याची व्यवस्था नव्हती. काशीचा प्रकार अगदीं निराळाच म्हटला पाहिजे. मोठमोठे विद्वान्, तपस्वी, स्वामी, संन्यासी मोक्ष साधनांसाठीं काशीस राहण्यास येत. काशींतच देह टाकावा हा त्यांचा निश्चय. पण ज्याप्रमाणें देहाबरोबर सावली त्याप्रमाणें विद्वानांमागें विद्या चालते. याचा अर्थ असा कीं, हे सर्व विद्वान् किंवा साधु स्वतःच एखाद्या चालत्या बोलत्या विद्यापीठासारखे असत. दुसरें असें त्या काळीं विद्यार्थ्यांना गुरु शोधीत हिंडावें लागे. यामुळें अशा विद्वानांना प्रयत्न करून, त्यांची सेवा करून, त्यांची विद्या मिळवावी म्हणून त्याकाळचे धाडसी व बुद्धिमान् विद्यार्थी सदा खटपटींत असत. तेव्हां कांहीं योग्य आणि निवडक शिष्य अशा विद्वत्वर्यांच्या मागें असतच. त्यांतील कांहीं भाग्यवान आपल्या सेवेच्या बळावर आणि श्रमाच्या आधारावर गुरुपासून त्याची सर्व विद्या मिळवीत. शिष्य सवाई मिळावा, तो आपल्यापेक्षां मोठा व्हावा, त्याचें नांव मोठें झालें तर आपलें होणारच या भरंवशानें गुरूहि सत्पात्र शिष्य मिळावा हीच इच्छा करीत. असा समसमां संयोग होऊन मग विद्यानदी अधिक डौलानें आणि वैभवानें पुढें वहात राही. यालाच विद्येची परंपरा म्हणतात. अशी मोठी परंपरा काशींत चालत रहात असे. त्यामुळें काशीचें नांव साऱ्या दुनियेंत गाजत असे. पुढें पुढें तर असा शिरस्ताच पडून गेला कीं, विद्येचा कस लावून पहावयाचा असला तर त्यानें काशींत जाऊन तेथील विद्वानांची शाबासकी मिळविली पाहिजे. काशी जिंकून आला म्हणजे तो अजिंक्य झाला. मग त्यानें वाटल्यास खुशाल दिवसा मशाली लावून हिंडावें. असें हिंडणें सोपे नव्हतें. पण मान मात्र मिळत होता हें खरें.

## नगरीचा इतिहास


या दृष्टीनें काशी हें भारतांतील सर्वांत श्रेष्ठ विद्यापीठ समजलें जाऊं लागलें. काशीचा विश्वनाथ जसा सर्वांत मोठा तशीच काशी सर्वांत मोठी. दुर्दैव असें कीं, या अशा पहिल्या श्रेणीच्या नगरीचा इतिहास आपल्याला उपलब्ध नाहीं. आज जी काशी आपणाला दिसते ती अर्वाचीनच म्हटली तरी चालेल. तसें म्हटलें तर ही प्रख्यात नगरी फार प्राचीन आहे. पूर्वी काशी हा एक प्रदेशहि असावा. काशी हें अनेक सुबक आणि विलासी कलांचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. काशीची ती प्रख्याति आजहि आहे. चंदनाच्या सुवासानें घमघमलेल्या काशीच्या साड्यांचा लौकिक आजहि प्रख्यात आहे. अशी काशी अनेक राजांच्या अभिलाषाचें कारण

बनली. आक्रमणें नि प्रतिआक्रमणें यांनीं काशीचा इतिहास भरलेला आहे. यांत पुढें यवनांच्या आक्रमणाची भर पडली. यामुळें काशी अनेकवेळा बेचिराख झाली तरीहि ती पुन्हा उभी राहिली. जगांत इतका सुंदर नदीचा बांक आणि त्या काठीं उभी राहिलेली उत्तुंग नगरी नाहीं असें म्हणतात. या मोहक स्थळीं पांच दहा कोसांत पूर्वी द्राविड असतील. पुढें वैदिक आर्य आले. त्यांच्या दहा दहा अश्वमेघ करणाऱ्या राजांची दशाश्वमेघ घाट साक्ष देतो. नगरीचा नाश केला म्हणून प्रौढी मिरविणाऱ्या मुसलमान वीरांच्या साक्षीहि काशींत दिसतील.

## आजच्या काशीचें श्रेय मराठ्यांना

हें सर्व कांहीं असलें तरी आजची जी काशी नगरी आहे ती मराठ्यांनीं वसवलेली आहे असें बनारसचे लोक आदरानें वर्णितात आणि आतां इकडील मराठ्यांना त्याची आठवण राहिली नसली तरी इतिहास मात्र तें विसरला नाहीं. आजचा विश्वेश्वर पुण्यश्लोकी श्रीअहिल्याबाई होळकर यांनीं उजागरीला आणला. बाळाजी विश्वनाथापासून ही उध्वस्त धर्मनगरी पुन्हा उभी करावी म्हणून मराठ्यांनीं प्रयत्न केला, तीच काशी आज आपण पाहतों. मराठ्यांच्या पूर्वीच्या काळीं मोडलेलें विश्वेश्वराचें मंदिर अकबर बादशहाच्या परवानगीनें बांधलेलें असलें तरी तें बांधण्याची मूळ प्रेरणा महाराष्ट्रांतील गोदातीरच्या पंडित नारायण भट्टांची. पंडित नारायण भट्ट यांची योग्यता फार मोठी आहे. गागाभट्ट याच वंशातले. या भट्ट घराण्याच्या जोडीला शेष घराणें हेंही गोदातीरीचें. या शेष घराण्यांतच एकापेक्षां एक वरचढ विद्वान् होऊन गेले. भट्ट आणि शेष यांनीं रचलेलें अनेक मोठमोठे ग्रंथ विद्वानांना परिचित आहेत. शिष्यांच्या नांवांची प्रसिद्धी अधिक म्हणून रसगंगाधरकर्ते प्रख्यात जगन्नाथ पंडित किंवा सिद्धान्त कौमुदीचे कर्ते भट्टोजी दिक्षित किंवा तिसरे तर्क संग्रहाचे कर्ते अण्णभट्ट हें तिघेहि शिष्य होते. वीरेश्वर शेषाचे हें तिघे शिष्य आणि त्यांचे विश्वविख्यात ग्रंथ सर्वत्र भारतांत विद्यार्थी आजही पढतात. असे शिष्य आणि असे गुरु आणि त्यांची घराणीं ज्या काशीनगरींत नांदली ती काशी जिवंत विद्यापीठ न म्हणावी तर काय म्हणावें ! मोजकेच गुरु आणि त्यांचे मोजकेंच शिष्य यांचीही कौस्तुभमाला काशीनगरीच्या गळ्यांत जोंवर चमकत राहील तोंवर काशीचें नांव 'अनामिका सार्थवती बभूव' या वचनाप्रमाणें पहिले बोट मोजूनच थांबवावयाला लावील यांत संशय नाहीं.

(आकाशवाणीच्या सौजन्यानें)



श्रीज्ञानेश्वर जीवन

# बालमनावरील संस्कार

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

## प्रकरण ५ वें

निवृत्ति नाथांनी गहिनी नाथांकडून उपदेश घेतल्यानंतर ज्ञानेश्वर महाराजांना दीक्षा दिली. आपल्या मुलांना ब्राह्मणांकडून द्विजत्वाचे हक्क मिळतील ह्या आशेवर आपल्या माता पित्यांनी कोणतें भयंकर दिव्य पत्करलें, हें चित्र निवृत्ति ज्ञानदेव तर राहोतच, पण चिमुरड्या मुक्ता पुढेंही चांगलेंच होतें. द्विजत्वाचे हक्क आपणाला ह्या कामी स्वार्थी लोकांकडून मिळणार नाहीत हें निवृत्ति ज्ञानदेवांनीं ताडलें. अहंकार, अधिकार आणि स्वार्थ ह्यांनीं बरबटलेल्या ब्राह्मणांकडून ह्या मुलांचा जसजसा जास्त छळ होऊं लागला, तसतसा कुळंबी जनतेच्या मनांत ह्या मुलांविषयीं जास्त प्रेमा व आदर वाढूं लागला. चाऱ्ही भावंडें सुंदर, तेजस्वी, गोड स्वभावाची व वयाच्या मानानें अत्यंत शहाणी असल्यामुळें सर्व जनतेला त्यांचा लळा लागला, उलट त्या चार भावंडांना त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या लोकांबद्दल आपलेपणा वाढूं लागला. ह्या अन्योन्य प्रेमाच्या सृष्टींत जसा आपणाला द्विजत्वाचा अधिकार नाहीं तसाच तो ह्या कुळंब्यांची भाषा बोलणाऱ्या साऱ्या मराठी बोली बोलणाऱ्या—लोकांस नाहीं, हा अन्याय समदुःखी ह्या न्यायानें त्यांच्या चटकन् ठळकपणें ध्यानांत आला. हळुहळू स्वतःला झालेल्या अन्यायापेक्षां जनतेला होत असलेल्या अन्यायाची जाणीव तीव्रपणें होऊं लागली.

द्विजत्वाचा अधिकार म्हणजे काय ? सद्गुरूच्या अनुग्रहानें देवाच्या जवळ जाणें हेंच ना ! द्विजत्वाची दीक्षा देण्याच ताम्रपट फक्त संस्कृत पढित ब्राह्मणांनाच कांहीं परमेश्वरानें दिलेलें नाहीं. 'ब्रह्म-जानाति ब्राह्मणः' ह्या लक्षणांनी युक्त असेल तोच खरा ब्राह्मण. तत्कालिन ब्राह्मण तर ह्या लक्षणाला पारखे झालेले. ह्या लक्षणांनी युक्त असे पंढरपुरच्या वारकरी सांप्रदायांतील संत त्यांच्या नजरेसमोर होते. अर्थात् संत हेच खरे ब्राह्मण आणि द्विजत्वाची दीक्षा देणारे अधिकारी ही समस्या निवृत्ति–ज्ञानदेवापुढें उभी राहिली. तत्कालीन धर्म हा संस्कृतज्ञ अशा अल्प संख्य लोकांचें कुरण होतें. बहुसंख्य गरीब लोकांना धर्म नाहीं, देव नाहीं, धर्म ग्रंथही नाहीं. ह्यापुढें धर्माला पारखे

होऊन बसलेल्या ह्या आर्त पण भाविक जनतेचा उद्धार हीच खरी देवसेवा, हाच खरा धर्म, असें ह्या भावंडांच्या मनांत स्वानुभवानें पक्कें बिंबलें. संत हेच खरे ब्राह्मण, त्यांच्या द्वारें आम आर्त जनतेस द्विजत्वाची दीक्षा देण्याचें कार्य पंढरपुरांत भागवत धर्मीयांनीं चालविलें होतेंच. त्याच कार्याला सर्वस्वी वाहून घेण्याची चर्चा ह्या चार भावंडांत सुरू झाली. ब्राह्मणांनीं वाळींत टाकल्यामुळें कुळंब्याचें जग हेंच आतां त्यांचें जग होऊन बसलें होतें. त्या जगाचे ते पंचप्राण होऊन बसले होते. त्यांच्यासमोर पंढरीची वारी करून आलेली मंडळी होती. त्यांच्या तोंडून त्यांनीं नामदेवासारख्या संताची त्यांनीं कीर्ति ऐकली होती. निवृत्ति ज्ञानदेवांची दृष्टि आतां आळंदी ते पंढरपुरापर्यंत सर्व कुळंब्याची भाषा बोलणाऱ्या मराठा मंडळाकडे फांकली. ह्या मराठमोळ्यांस त्यांच्या भाषेंत लिहिलेले धर्म ग्रंथ नाहींत, ही उणीव त्यांच्या लक्षांत आली. कुळंब्यांच्या भाषेंत धर्मग्रंथ लिहिणें म्हणजे महत्पाप असा तत्कालीन अधिकारी ब्रह्मवृंदांचा दंडक! हा दंडक मोडणें म्हणजे प्राण पणास लावण्याचें धाडस करणें होय, हेंसुद्धां त्यांना अवगत होतेंच. अन्यायी ब्रह्मवृंदांविरुद्ध बंडाचें बीज त्यांच्या उपजत बुद्धींत अंकुरित झालें होतेंच. त्यांत बहुजन उद्धाराची तळमळ ह्याची भर पडली. एका बाजूस कर्मठ, स्वार्थी व दुराग्रही ब्रह्मवृंद व दुसऱ्या बाजूस मराठी बोली बोलणाऱ्या ज्ञानदेवाचें लाडकें महाराष्ट्रमंडळ; ह्या दोन पक्षांतल्या संघर्षाचा हा प्रारंभ होता. ह्या चार भावंडांच्या उपजत बुद्धीच्या प्रभंजनानें द्विजत्वाचे अधिकार देणारी ब्राह्मणांची मिरासदारी करून ते अधिकार भागवत सांप्रदायांतील संतांना दिले. उद्ध्वस्त कर्मठ, दीक्षित आणि त्यांचे संस्कृत धर्म ग्रंथ जसेच्या तसे पडून राहिले आणि संतांच्या वाणीला वेदवाक्याचें महत्व लाभलें. ह्या चार भावंडांना वाळांत टाकल्यामुळें त्यांच्या मनोभंगाचें पर्यवसान लोकसेवेच्या उदात्ततेंत होऊन निवृत्ति ज्ञानदेवांनी महाराष्ट्रांत मोठी धार्मिक व भाषिक क्रांति केली. ह्या क्रांतीमुळेंच महाराष्ट्राची भाषा व धर्म हीं दोन केंद्रें



चिरस्थायीं केली. म्हणूनच पुढें तीनशें वर्षांनी रामदासाला महाराष्ट्र धर्म कोणता व महाराष्ट्र देश कोणता हें ओळखतां आलें, आणि शिवाजीस स्वराज्य–संस्थापनेला लागणारी धर्मासाठीं पंचप्राण देणारी वारकरी मावळसेना लाभली. अशा तऱ्हेचा अभिप्राय न्या. रानडे व लोकमान्य टिळकांनी स्पष्टपणें नमूद केला आहे. न्या. रानड्यांनीं ज्ञानेश्वरांना महाराष्ट्रांतील ल्यूथर असें संबोधून ज्ञानेश्वरांनीं धर्म क्रांति केली असें स्पष्टपणें म्हटलें आहे. ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे ज्ञानदेव हे महाराष्ट्राचे पहिले क्रांतीवीर होते. बाल्यावस्थेपासून ह्या भावंडांच्या उपजत बुद्धीच्या प्रभावांतूनच ज्ञानेश्वरी सारखा लोकोत्तर ग्रंथ निर्माण झाला, आणि तद्द्वारें महाराष्ट्र धर्म म्हणून भागवत धर्माचा पाया रचला जाऊन, धर्मश्रद्धेच्या जोरावर सर्व संकटांशीं झुंझार टक्कर देणारा असा मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा एक प्रचंड संघ उभा करण्यांत आला. ज्या भावंडांना द्विजत्वाचे हक्क दिले नाहींत त्यांनींच सामान्य जनतेवरहि द्विजत्वाची खैरात केली आणि संस्कृत भाषेच्या तोडीस तोड देईल असा ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ जगास बहाल केला.

एवढेंच नव्हे तर मराठी भाषेंत पहिलाच साहित्य दृष्टीनें अद्वितीय असा धर्मग्रंथ लिहून मराठी भाषेला शिष्टमान्य आणि नागरी दर्जा दिला. म्हणजे खऱ्या मराठी भाषेला जगांतील कोणत्याही नागरी भाषेच्या बरोबरीचा दर्जा देण्याचें अलौकिक कार्य ज्ञानेश्वरांनीं केलें. ज्ञानेश्वरी हाच शिष्ट मराठी भाषेचा व मराठी साहित्याचा खरा प्रारंभ होय हें साहित्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें ऐतिहासिक सत्य अजूनपर्यंत विद्वांनाच्या लक्षांत यावें तितकें आलेलें नाहीं. तें तसें जर आलें असतें तर ज्ञानेश्वरी ग्रंथ केवळ वारकऱ्यांचीच माउली नसून मराठी भाषा बोलणाऱ्या अखिल बृहन्महाराष्ट्राचीही माउली आहे हें ऐतिहासिक सत्य आजपर्यंत दृष्टिआड झालें नसतें. ह्या सर्व धार्मिक व भाषिक क्रांतीचा उगम ब्राह्मणांनीं वाळींत टाकलेल्या ज्ञानेश्वरांच्या उपजत बुद्धींत झाला याची साक्ष तत्कालीन इतिहास देत आहे.

---

Cable : **MEHTAMOTORS** Phone: **42456**

**MEHTA MOTOR STORES**

**IMPORTERS WHOLESALERS.**

AUTOMOBILE HARDWARE ELECTRICAL INDUSTRIAL

497, Sardar V. Patel Road,
BOMBAY-4.